ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 7 | ISSUE - 5 | JAN - 2021

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# सोलापूर जिल्हयातील सांस्कृतिक विकासात धार्मिक स्थळाचे पर्यटनदृष्टया महत्व



प्रा.डॉ.युवराज गुंडू सुरवसे
सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग
छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, सोलापूर.

## प्रस्तावना

पर्यटन हे मनोरंजनाबरोबर, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, आरोग्य ऐतिहासिक दृष्टीकोनातून विकसित व विकसनशील राष्ट्रामध्ये होते. बदल हा मानवी जीवनाचा स्थायी भाव आहे. व्यक्तीला असलेल्या जिज्ञासा हीच पर्यटनास प्रेरणा देणारी ठरते. पर्यटनात व्यक्ती समाज राष्ट्र व आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनातून विशेष महत्त्व ही आहे. सोलापूर जिल्हयाच्या दृष्टीने पर्यटनाला अत्यंत महत्व आहे. सोलापूर जिल्हयातील प्रसिध्द धार्मिक स्थळे हे सोलापूरच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण आहे. सोलापूर जिल्हयातील अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिर, मंगळवेढा येथील संत दामाजी पंत यांची समाधी, सोलापूर शहरातील सिध्दरामेश्वर मंदिर, पंढरपूर येथील विठ्ठल मंदिर, बार्शी येथील विष्णू मंदिर, हे सोलापूर जिल्हयाच्या वैभवात भर घालणारे असून यामुळे पर्यटनाला मोठया प्रमाणावर चालना मिळते.

पर्यटन म्हटले की प्रवास आला आणि प्रवासातून मानवाचे अनुभवात वाढ ज्ञानात भर, मनोरंजन, सांस्कृतिक दृष्टया आदान प्रदान, हे या पाठीमागे तर आहेच. पर्यटन ऐतिहासिक, सांस्कृतिक, भौगोलिक, धार्मिक, सामाजिक व आर्थिक दृष्टया केले जाणारे पर्यटन असते. पर्यटन सर्वात महत्त्वपूर्ण म्हणजे आनंद, मनोरंजनासाठी, नवीन ज्ञानाची माहिती करुन घेण्यासाठी असते.

जगातील अनेक देशात सध्या पर्यटनाला अंत्यंत महत्त्व आल्याचे दिसून येते. जागतिक दृष्टीकोनातून होणा-या पर्यटनाला विविध देशातील सांस्कृतिक आदान प्रदानाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. सोलापूर जिल्हयाचे ऐतिहासिक महत्त्व ही मोठे आहे. तसेच शहराला राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक दृष्टया मोठया प्रमाणावर महत्व असल्यामुळे पर्यटक सोलापूर जिल्हयाकडे मोठया प्रमाणावर आकर्षित होतात.

महाराष्ट्रातील अनेक जिल्हयापैकी सोलापूर जिल्हयाचे वेगळेपण म्हणजे सोलापूरातील धार्मिक स्थळे पर्यटनाच्या दृष्टीकोनातून पर्यटकाला आकर्षित करतात.

## उद्दीष्टये

१) आधुनिक काळातील पर्यटनाचे महत्त्व जाणून घेणे.
२) सोलापूर शहर व जिल्हयातील पर्यटनाच्या माध्यमातून सोलापूर जिल्हयाच्या विकासातील आर्थिक महत्त्व जाणून घेणे.
३) सोलापूर जिल्हयातील धार्मिक पर्यटनाची माहिती घेणे.

## संशोधन पध्दती

सदर शोधनिबंध लिहिण्यासाठी ग्रंथालयीन पध्दतीचा, प्राथमिक व दुय्यम साधन साहित्याचा वापर केला आहे.

## सोलापूर जिल्हयातील धार्मिक स्थळे

### पंढरपूर

दक्षिणेची काशी म्हणून ओळख असलेले पंढरपूर आणि पंढरपूरच्या विठ्ठलवारीसाठी वारकरी चैत्री, आषाढी व माघी, कार्तिकी एकादशीच्यासाठी लाखो वारकरी नित्य नियमाने येत असतात. धार्मिक व आध्यात्मिक दृष्टीकोनातून महाराष्ट्रभर नव्हे तर जगभर

पंढरपूरची ओळख निर्माण झालेली आहे. व विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी देशभरातून लोक पायी चालत येतात. क्षेत्र माहात्म्यामुळे पंढरपूरला महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणतात.

अभ्यासक हा आपला प्रवास पर्यटन म्हणून जरी करीत असला तरी त्यामागे धार्मिक दृष्टीकोनातून आणि माहिती जाणून घेणे काहीजण मनोरजनात्मक दृष्टया ही पंढरपूरला मोठया प्रमाणावर येतात. त्यामुळे पंढरपूरच्या दृष्टीने नव्हे तर सोलापूर जिल्हयाच्या दृष्टीने आर्थिक क्षेत्रात मोठी उलाढाल होत असते.

### मंगळवेढा

सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा तालुक्यातील संत दामाजी पंतांचे प्रसिध्दी फार मोठया प्रमाणावर आहे. मंगळवेढा नगरी संत दामाजी पंताच्या नावाने ओळखली जाते. इ.स. १४४८ ते १४६० ही दोन वर्ष श्री दामाजीचा दुष्काळ म्हणून ओळखली जातात.

याच काळात दामाजी पंतांनी मंगळवेढे येथे तहसिलदार म्हणून बिदरच्या महंमदशहाने नेमणूक केली होती. जनता दृष्काळामुळे हवालदिल झाली. दामाजी पंतांनी धान्याची कोठारे लोकांसाठी खुली केली. बादशहाने त्यांना अटक करण्यासाठी सैन्य पाठविले व बिदर येथे येण्यास फर्माविले. कथा अशी सांगितली जाते की, प्रवासादरम्यान पांडूरंगाने दामाजी पंतांच्या विठू महार या नोकराचे रुप घेऊन बादशहाला सव्वा लाख रुपये किमतीच्या सोन्याच्या मोहरा देऊन त्याची पावती घेतली व दामाजी पंतांच्या गीतेच्या पोथीत ठेवली. दामाजी पंताची सुटका झाली व त्याचा सत्कार झाला. अशा महान संताच्या दर्शनासाठी महाराष्ट्रातील भाविक मोठया प्रमाणावर संत दामाजी पंताच्या समाधीस्थळाच्या दर्शनासाठी येतात.

### स्वामी समर्थ (अक्कलकोट )

१९ व्या शतकात होऊन गेलेले दत्त संप्रदायातील एक थोर संत श्री स्वामी समर्थ महाराज होय. श्रीपाद वल्लभ व नृसिंह सरस्वामी यांच्या नंतरचे भगवान श्री दत्तात्रेयांचे हे तिसरे पूर्णावतार अवतार मानले जातात. स्वामी समर्थांच्या भक्तीचा प्रसार महाराष्ट्र व कर्नाटकात मोठया प्रमाणावर झालेला दिसून येतो. श्री स्वामी समर्थ महाराजांचे स्थान म्हणून अक्कलकोट प्रसिध्द आहे. अक्कलकोट शहर सोलापूर जिल्हा मुख्यालयापासून ३५ कि. मी. अंतरावर वसलेले आहे. दर वर्षी चैत्र शुध्द त्रयोदशीला स्वामी समर्थांची पुण्यतिथी साजरी केली जाते. राज्यातून व पर राज्यातून मोठया संख्येने भक्त गण नित्य नेमाने भेट देण्यास येतात.

### बार्शी

बार्शी येथील भगवंत मंदिर हे विष्णूला समर्पित आहे. भारतात विष्णूची मंदिरे अतिशय कमी ठिकाणी आहेत. सोलापूर जिल्हयातील बार्शी येथे हे विष्णू मंदिर असून ते हेमाडपंती स्थापत्य शैलीत असून मंदिराला चार दिशांनी चार प्रदेशद्वार आहेत पण मुख्य प्रवेशद्वार हे पूर्वाभिमुख आहे. भगवंताची मूर्ती काळया पाषाणाची असून हातात शंख, चक्र, गदा आहेत. मंदिराला पेशव्यांच्या काळात १७६० साली, तसेच ईस्ट इंडिया कंपनीने व पुढे ब्रिटिश सरकारने इनाम दिल्याचे नोंदी इतिहासात आढळतात. पंढरपूरच्या यात्रेप्रमाणे येथे भक्तगण मोठया संख्येने एकादशीच्या दरम्यान बार्शी येथील या मंदिरास भेट देतात.

### करमाळा

श्री कमला देवीच्या मंदिरामुळे करमाळा शहर प्रसिध्द झाले. या मंदिराचे विशेष महत्व म्हणजे श्री राव राजे निंबाळकरांनी १७२७ मध्ये कमला भवानीचे मंदिर बांधले. करमाळा मंदिराला तुळजापूरच्या भवानीचे दुसरे पीठ असे संबोधले जाते. मंदिराचे वैश्ष्टिय म्हणजे मंदिर हेमाड पंथी शैलीत बांधलेले असून मंदिराला दक्षिणपूर्व व उत्तर दिशेला प्रवेशद्वार आहेत मंदिराची विशेषता मंदिरासमोरील विहिरीस ९६ पाय-या, मंदिरात ९६ ओ-या, मंदिराच्या छतावर ९६ चित्रे रेखाटले, मंदिरात एकूण खांब ९६ यावरुन ९६ या संख्येला विशेष महत्त्व दिसून येते. देवीच्या नवरात्राच्या दिवसात भक्त गणाची मोठया प्रमाणावर गर्दी दिसून येते.

### हत्तरसंग कुडल

सोलापूर जिल्हयातील दक्षिण सोलापूर तालुक्यात भीमा आणि सीना नदीच्या संगमावर हत्तरसंग कुडल हे ठिकाण आहे. सोलापूर शहरापासून ४२ किमी अंतरावर हे प्राचीन शिव मंदिर असून या ठिकाणी पुणे येथील डेक्कन कॉलेज व सोलापूर विद्यापीठवतीने उत्खनन करुन या स्थळांचे उत्खनन करण्यात आले आहे. हे मंदिर हेमाडपंती बांधकाम शैलीतील असून या मंदिराला महाराष्ट्र आणि कर्नाटकातील अनेक भाविक श्रावण महिन्यात दर्शनासाठी मोठया प्रमाणावर गर्दी करतात. येथे असणा-या शिवमंदिराचे वैशिष्टय म्हणजे येथे ३६५ शिवलिंगाचे अनोखे दर्शन पर्यटकांना होत असते. या पर्यटन स्थळावर महाराष्ट्र शासनाच्या वतीने पर्यटकांना अनेक सोयी सुविधा उपलब्ध करुन देऊन पर्यटकांना आकर्षित केले जात आहे.

## पर्यटनाचे आर्थिक महत्त्व

सोलापूर जिल्हयातील धार्मिक स्थळांची मोठया संख्या असल्यामुळे सोलापूरच्या विकासात मोठया प्रमाणावर याचा फायदा झाल्याचे दिसून येते. सोलापूर जिल्हयातील धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी महाराष्ट्रातीलच नव्हे तर अनेक राज्यांमधून भेटी देणा-यांची संख्या ही मोठी आहे. त्यामुळे साहजिकच सोलापूर शहर व जिल्हयातील परिसराच्या विकासात या पर्यटनाचा मोठया प्रमाणावर वाटा आहे. सोलापूर जिल्हा व परिसरात लॉजिंग, हॉटेल्स, सेवा क्षेत्रात, टुरिस्ट, शिवाय अनेक लोकांच्या हाताला यामुळे काम मिळत असून सोलापूर शहरांचा मोठया प्रमाणावर प्रगती झाल्याचे दिसून येते.

## निष्कर्श

सोलापूर जिल्हयात अनेक प्रसिध्द धार्मिक स्थळ असून त्यांची मोठी महती आहे. यामुळे मोठया प्रमाणावर पर्यटक आकर्षित होऊन या स्थळांना भेटी देतात. या भेटी मागे मनोरंजन, ज्ञान मिळविणे आध्यात्मिक स्थळांना भेटी देण्यामागील त्याची मनाची समाधान वृत्ती यामुळे भारत भरातील बहुतांशी पर्यटक सोलापूर जिल्हयाला भेट देतात.

या माध्यमातून शहर व परिसराला या पर्यटकाच्या रुपाने मोठया प्रमाणावर चलन मिळते. यामुळे जिल्हयाच्या विकासात मोठी प्रगती झाल्याचे दिसून येते.

## संदर्भग्रंथ :-


१) महाराष्ट्र राज्य : मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, २०१४.

२) जोशी लक्ष्मणशास्त्री : मराठी विश्वकोश, खंड १२ वा, १९८१.

३) कुलकर्णी दत्ता : महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे, १९७४.

४) डॉ. विकास कदम, डॉ. बाळकृष्ण माळी : ऐतिहासिक दृष्टीकोनातून पर्यटन प्रकाशन, अक्षर मुद्रण मंदिर प्रकाशन, प्रथमावृत्ती - जुलै २००६.